असा. क्र. ३०१ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

सोमवार, डिसेंबर १, २००३/अग्रहायण १०, शके १९२५

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

भाग चार-ब

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमान्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

गृह विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २७ नोव्हेंबर २००३

अधिसूचना

मुंबई सिनेमा (विनियमन) अधिनियम, १९५३.

क्रमांक बीसीआर. ५३९९/११४/एसपीएल-५.—मुंबई सिनेमा (विनियमन) अधिनियम, १९५३ (१९५३ चा मुंबई ११) याच्या कलम ९ च्या पोट-कलम (१) व खंड (अ) व पोट-कलम (२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा व महाराष्ट्र शासनास त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे महाराष्ट्र चित्रपटगृहे (विनियमन) नियम, १९६६ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियमांचा मसुदा उक्त कलम ९ च्या पोट-कलम (४) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे त्याद्वारे बाधा पोहोचण्याचा संभव असलेल्या सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करीत आहे आणि याद्वारे अशी सूचना देण्यात येत आहे की, उक्त मसुदा महाराष्ट्र शासन दिनांक २० [redacted] डिसेंबर २००३ रोजी किंवा त्यानंतर विचारात घेईल.

या मसुद्याबाबत कोणत्याही व्यक्ती व संस्थांकडून, प्रधान सचिव (अपील व सुरक्षा) गृह विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांच्याकडे उपरोक्त दिनांकापूर्वी आलेल्या हरकती किंवा सूचना शासनाकडून विचारात घेतल्या जातील.

नियमांचा मसुदा

१. या नियमांना महाराष्ट्र चित्रपटगृहे (विनियमन) (सुधारणा) नियम, २००३ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र चित्रपटगृहे (विनियमन) नियम, १९६६ (यात यापुढे ज्यांचा निर्देश " मुख्य नियम " असा करण्यात आला आहे.) नियम २४ फ मध्ये,—

(अ) पोट-नियम (२) ऐवजी पुढील पोट-नियम दाखल करण्यात येईल व हे नियम दिनांक १ जानेवारी २००२ पासून अंमलात आले आहेत असे समजले जाईल :—

(२) व्हिडीओ परवाना अथवा परवान्याचे नूतनीकरण यासाठी पुढीलप्रमाणे फी असेल :—

	बृहन्मुंबई	बृहन्मुंबईव्यतिरिक्त इतर पोलीस आयुक्तालय	इतर ठिकाणी
सहा महिन्यांहून अधिक असणार नाही एवढ्या मुदतीकरिता	१,२००	१,०००	९,००
सहा महिन्यांहून अधिक असणाऱ्या परंतु एक वर्षापेक्षा अधिक असणार नाही एवढ्या मुदतीकरिता	२,०००	१,८००	१,५००

(ब) परिच्छेद (२) टिपांमध्ये,—

(एक) " बृहन्मुंबई शहरामध्ये २,००० रुपये, बृहन्मुंबईव्यतिरिक्त इतर पोलीस आयुक्तालयाच्या क्षेत्रामध्ये १,५०० रुपये व इतर ठिकाणी १,००० रुपये " या मजकुराऐवजी " रु. १०० " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(दोन) " बृहन्मुंबई शहरामध्ये ४,००० रुपये, बृहन्मुंबईव्यतिरिक्त इतर पोलीस आयुक्तालयाच्या क्षेत्रामध्ये ३,००० रुपये व इतर ठिकाणी २,००० रुपये " या मजकुराऐवजी " रु. २०० " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(क) हे नियम दिनांक १ जानेवारी २००२ पासून अंमलात आले आहेत असे समजले जाईल.

३. नियम २४ (ह) मधील पोट-नियम (३) वगळण्यात येईल.

टीप.—परवानाधारकाने सन २००२ व सन २००३ करिता भरलेले अतिरिक्त परवाना शुल्क परत न करता पुढील वर्षाच्या नूतनीकरण शुल्कात समयोजित करून त्याबाबत परवान्यावर सविस्तर नोंद करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सुरेश महाजन,
शासनाचे सहसचिव.

HOME DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 27th November 2003

NOTIFICATION

BOMBAY CINEMAS (REGULATION) ACT, 1953.

No. BCR. 5397/66/SPL-5.— The following draft of rules further to amend the Maharashtra Cinemas (Regulation) Rules, 1966, which the Government of Maharashtra proposes to make in exercise of the powers conferred by sub-section (*1*) and clause (*a*) of sub-section (2) of section 9 of the Bombay Cinemas (Regulation) Act, 1953 (Bom. XI of 1953), and of all other powers enabling it in that behalf, is hereby published as required by sub-section (*4*) of the said section 9, for the information of all persons likely to be affected thereby ; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra on or after day 20th December 2003.

Any objections or suggestions which may be received by the Principal Secretary to the Government of Maharashtra in the Home Department (Special), Mantralaya, Mumbai 400 032, from any persons or organization with respect to the said draft before the above said date will be considered by Government.

DRAFT RULES

1. These rules may be called the Maharashtra Cinemas (Regulation) (Amendment) Rules, 2003.

2. In rule 24F of the Maharashtra Cinemas (Regulation)Rules, 1966. (hereinafter referred to as the "the principal rules"),—

(*a*) sub-rule (2), the following shall be substituted, and shall be deemed to have been substituted with effect from 1st January 2002, namely :—

"(2) The fees for the videos cinema licence or renewal of licence shall be as follows :—

	In Brihan Mumbai	In Police Commissionerate Area other than Brihan Mumbai	In other places
	Rs.	Rs.	Rs.
(1) For a period not exceeding six months	1,200	1,000	900
(2) For a period exceeding six months but not exceeding one year.	2,000	1,800	1,500

(b) In the Notes in paragraph (2),—

(i) for the letters, figures and words "Rs. 2,000 in Brihan Mumbai City, Rs. 1,500 in Police Commissionerate area other than Brihan Mumbai and Rs. 1,000 at other places" the letters and figure "Rs. 100" shall be subsituted and shall be deemed to have been subsituted with effect from 1st January 2002 and;

(ii) for the letters, figures and words "Rs. 4,000 in Brihan Mumbai City, Rs. 3,000 in Police Commissionerate area other than Brihan Mumbai and Rs. 2,000 at other places" the letters and figures "Rs. 200" shall be subsituted and shall be deemed to have been subsituted with effect from 1st January 2002.

3. In rule 24H of the principal rules, sub-rule (3) shall be deleted.

Note.—Any excess payment made by the licensees for renewal of licence for the year 2002 and 2003 shall not be refunded but shall be adjusted in the further renewal and details shall be noted on the licence.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SURESH MAHAJAN,
Joint Secretary to Government.